**मे. जयभवानी सहकारी साखर कारखाना लिमिटेड., सर्वे नं. १३८, १५५, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६४ व १७० तळेवाडी गाव आणि १६५, १६७ व १६८ गढी गाव, ता. गेवराई, जि. बीड या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये मोलॅसीस आधारीत आसवणी प्रकल्प ३० केएलपीडी ते १४० केएलपीडी पर्यंत सिरप आणि मोलॅसीस वापरून प्रस्तावित विस्तार, विद्यमान प्रतिदिन उस गाळप क्षमता २५०० टीसीडी वरून ५००० टीसीडी पर्यंत प्रस्तावित विस्तार आणि आसवणी प्रकल्पासाठी ५.४ मेगावॅटचा सह उत्पादन उर्जा प्रकल्पाची स्थापना (सध्या ८ मेगावॅट टीजी सेट शूगर युनिट) उत्पादन करणे बाबत दिनांक २१/११/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. जयभवानी सहकारी साखर कारखाना लिमिटेड., तळेवाडी गाव आणि गढी गाव, ता. गेवराई, जि. बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त: -**

---

मे. जयभवानी सहकारी साखर कारखाना लिमिटेड., सर्वे नं. १३८, १५५, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६४ व १७० तळेवाडी गाव आणि १६५, १६७ व १६८ गढी गाव, ता. गेवराई, जि. बीड या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये मोलॅसीस आधारीत आसवणी प्रकल्प ३० केएलपीडी ते १४० केएलपीडी पर्यंत सिरप आणि मोलॅसीस वापरून प्रस्तावित विस्तार, विद्यमान प्रतिदिन उस गाळप क्षमता २५०० टीसीडी वरून ५००० टीसीडी पर्यंत प्रस्तावित विस्तार आणि आसवणी प्रकल्पासाठी ५.४ मेगावॅटचा सह उत्पादन उर्जा प्रकल्पाची स्थापना (सध्या ८ मेगावॅट टीजी सेट शूगर युनिट) उत्पादन करणे बाबत दिनांक २१/११/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. जयभवानी सहकारी साखर कारखाना लिमिटेड., तळेवाडी गाव आणि गढी गाव, ता. गेवराई, जि. बीड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-७४/ २०२३ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २३१०२६- एफटीएस-०१७१ दि. २६/१०/२०२३ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. शिवकुमार स्वामी,**<br>अप्पर जिल्हादंडाधिकारी, बीड. | : | अध्यक्ष |
| २. | **श्री. सुजित ढोलम,**<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर. | : | सदस्य |
| ३. | **श्री. सो. म. कुरमुडे,**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना. | : | समन्वयक |

श्री. सो. म. कुरमुडे, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. जयभवानी सहकारी साखर कारखाना लिमिटेड., सर्वे नं. १३८, १५५, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६४ व १७० तळेवाडी गाव आणि १६५, १६७ व १६८ गढी गाव, ता. गेवराई, जि. बीड या प्रस्तावित प्रकल्पामध्ये मोलॅसीस आधारीत आसवणी प्रकल्प ३० केएलपीडी ते १४० केएलपीडी पर्यंत सिरप आणि मोलॅसीस वापरून प्रस्तावित विस्तार, विद्यमान प्रतिदिन उस गाळप क्षमता २५०० टीसीडी वरून ५००० टीसीडी पर्यंत प्रस्तावित विस्तार आणि आसवणी प्रकल्पासाठी ५.४ मेगावॅटचा सह उत्पादन उर्जा प्रकल्पाची स्थापना (सध्या ८ मेगावॅट टीजी सेट शूगर युनिट) उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात येत आहे. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'अ' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. जयभवानी सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. २६/०९/२०२३ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी दिं. २१/११/२०२३ वेळ-दूपारी १२.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. १८/१०/२०२३ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता खालील ठिकाणी ठेवण्यात आलेल्या होत्या.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
२. जिल्हा परिषद, बीड.
३. जिल्हा उद्योग केंद्र, बीड.
४. तहसिलदार, तहसिल कार्यालय, गेवराई.
५. ग्रामपंचायत कार्यालय, गढी, तळेवाडी, खांडवी, वडगाव ढोक, राजणी, मूलूकवाडी, पाडळसिंगी, ता. गेवराई, जि. बीड.
६. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, छत्रपती संभाजी नगर.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे एक सूचना इमेलद्वारे प्राप्त झाली त्याची नोंद घेण्यात आली आहे व सोबत जोडण्यात येत आहे. तरी उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर नोंदवू शकतात. त्यानंतर त्यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

डॉ. कवीता जोग, प्रकल्प सल्लागार, मे. मंत्रास ग्रीन रिसोरसेस लि., नाशिक यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे यांनी सांगितले की, सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे उपस्थित नागरिकांनी त्यांचे जे काही प्रश्न आक्षेप/टिका/टिप्पणी असतील ते केवळ पर्यावरण विषयक विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्पा व्यवस्थापकाच्या वतीने त्यांचे सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तर/आश्वासन खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्रं. | **केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव.** | **उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर.** |
|---|---|---|
| १. | **श्री. प्रकाश ढाकणे, रा. मिरकाळा, ता. गेवराई, जि. बीड** यांनी सांगितले की, आमच्या गावातील बरीचशी जमीन कारखान्याच्या आजूबाजूस आहे तर या नविन प्रकल्पामूळे पर्यावरण व आजूबाजूच्या जमिनीला काही हानी होईल का असे विचारले. | **यावर प्रकल्प सल्लागार**, यांनी सांगितले की, अगोदरच सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे प्रस्तावित उत्पादन हे Zero Liquid Discharge (ZLD) वर आधारीत आहे म्हणजे निर्माण होणारे सांडपाणी आजूबाजूच्या परिसरात जाणार नाही. हवेच्या प्रदूषाबाबत त्यांनी सांगितले की, प्रस्तावितला बॉयलर इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसीपिटेटर बसविण्यात येणार आहे त्यामूळे कूठल्याही प्रकारच्या प्रदूषणाचा त्रास होणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | **श्री. सचिन भास्कर ढाकणे, रा. वढगाव ढोक, ता. गेवराई, जि. बीड** यांनी विचारले की, माझे गाव सदर प्रकल्पापासून जवळपास २ कि.मी. आहे तर आपण झाडांची किती लागवड करणार आहेत. | **यावर कारखाण्याचे चेअरमन श्री. अमरसिंह पंडीत** यांनी सांगितले की, मे. जयभवानी साखर कारखाण्याच्या योजनेअंतर्गत जवळपास ५० हजार झाडे लावण्याचा उपक्रम जवळच्या ७ ते ८ गावांमध्ये करण्यात येणार आहे. |
| ३. | **श्री. मोहन बाबूराव काकडे, रा. निपाणी जवळा, ता. गेवराई, जि. बीड** यांनी विचारले की, कारखाण्याच्या वतीने आपण आजूबाजूच्या स्थानिक नागरिकांसाठी वैद्यकीय आरोग्य सेवा तपासणीचा कार्यक्रम घेणार आहात का. | **यावर कारखाण्याचे चेअरमन श्री. अमरसिंह पंडीत** यांनी सांगितले की, सदर कारखाण्याच्या अंतर्गत याअगोदरही आपण वैद्यकीय सेवा उपक्रम हाती घेतलेले आहे. तसेच यापूढेही वैद्यकीय कँप मोठया प्रमाणात घेण्यात येतील जसे की, ब्लड डोणेशन कँप, मेडीकल चेकअप इत्यादी. |
| ४. | **श्री. रामदास आसाराम शिंदे, रा. खांडवी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी विचारले की, कारखाना स्थानिक नागरिकांच्या आरोग्यासाठी काय काय उपाययोजना करणार आहे. | **यावर कारखाण्याचे चेअरमन श्री. अमरसिंह पंडीत** यांनी सांगितले की, कारखाण्याच्या अंतर्गत अगोदरच सांगितल्याप्रमाणे जवळच्या ७ ते ८ गावामध्ये नागरिकांच्या आरोग्यासाठी वैद्यकीय कँप मोठया प्रमाणात लावण्याचे नियोजीत आहे. |
| ५. | **श्री. रामप्रसाद छत्रगुणराव यादव, रा. ब-हानपूर, ता. गेवराई, जि. बीड** यांनी विचारले की, याअगोदर सदर कारखाण्यांमध्ये आमच्या गावातील एकूण ६ लोकांना कारखाण्याने कायस्वरूपी काम दिले आहे. तसेच या नविन प्रकल्पामूळे आमच्या गावातील व परिसरातील किती लोकांना काम दिले जाईल. | **यावर कारखाण्याचे चेअरमन श्री. अमरसिंह पंडीत** यांनी सांगितले की, कारखाना विस्तारीकरण दरम्यान याच भागातील रहिवाश्यांना काम दिलेले आहे. तसेच यापूढेही मनूष्यबळाची आवश्यकता लागणार आहे. नागरिकांच्या शैक्षणीक पात्रतेनूसार त्यांना काम दिले जाणार आहे तसेच आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनाच प्राधाण्य दिले जाणार आहे यात काही शंका नाही. |
| ६. | **श्री. आसाराम नामदेवराव रोडगे, रा. रांजणी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी विचारले की, कारखाण्यात काम करण्यासाठी शैक्षणीक पात्रता काय असायला हवी. | **यावर कारखाण्याचे चेअरमन श्री. अमरसिंह पंडीत** यांनी सांगितले की, अगोदरच सांगितल्याप्रमाणे शैक्षणीक पात्रता जसे की, आयटीआय, संगणांकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. कारखाण्यात विविध उपक्रमाद्वारे आपण त्यांना काम देणार आहोत. |
| ७. | **श्री. एच. मधूबाबू, पर्यावरणवादी, हैद्राबाद,** यांनी प्रकल्प व्यवस्थापनाला शुभेच्छा आणि समर्थन दिले. तसेच उद्योगाचे प्रतिनीधी यांनी | **यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना** यांनी याबाबत सांगितले की, आपल्या सूचनांची लिखीत नोंद घेण्यात आलेली |

| | | |
|---|---|---|
| | पर्यावरणाची काळजी घ्यावी अशी विनंती केली. रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी नागरिकांना उपलब्ध करून दयाव्यात अशी त्यांनी विनंती केली. तसेच या उद्योगाला बिनशर्त पर्यावरणीय मंजुरीसाठी MoEF&CC कडे शिफारस करत असल्याचे नमूद केले. | आहे. |

श्री. शिवकूमार स्वामी अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सर्वप्रथम उपस्थित कारखाण्याचे संचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, प्रकल्प सादरकर्ते तसेच उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. मे. जयभवानी साखर कारखान्याच्या प्रस्तावित विस्तार व नविन प्रकल्पासाठी सदर जाहीर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. पर्यावरणाची पूर्णपणे काळजी घेण्याबाबत सादरीकरण झालेले आहे. तसेच नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात आलेली असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच पूढे त्यांनी सांगितले की, कारखाण्याचे प्रतिनिधी पर्यावरणाविषयी योग्य ती काळजी घेतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तदनंतर शेवटी त्यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **सों. म. कुरमुडे**<br>(समन्वयक)<br>तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, जालना. | **सुजित ढोलम**<br>(सदस्य)<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर. | **शिवकुमार स्वामी**<br>(अध्यक्ष)<br>तथा<br>अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड. |